वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि.५ ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## सोमवारी नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत तर आठ तारखेला नगरसेवक पदाच्या आरक्षणाची सोडत

# कोणाच्या नशिबी नगराध्यक्षपद ?

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

### बीडची जागा आरक्षित होणार की खुल्या वर्गाला सुटणार ?, शहरभरात चर्चाच चर्चा

### गल्ली-बोळात, चौका-चौकात भावी नगरसेवक मतदारांशी जवळीक साधतांना दिसणार







## बीडच्या नगराध्यक्षपदासाठी समीर काझी यांच्या नावाची जोरदार चर्चा; ८ तारखेला होणाऱ्या नगरसेवक पदाच्या आरक्षणाच्या सोडतीनंतर सर्व प्रभागात इच्छूकांची गर्दी वाढणार

बीड (दिव्य न्युज):- नगर पालिका निवडणूक प्रक्रियेने वेग घेतला आहे. आज सोमवारी नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत पुर्ण झाल्यानंतर नगरसेवक पदाच्या निवडणूकीच्या आरक्षणाची सोडत ८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. तसे कार्यक्रम जाहिर झाले असून प्रत्येक नगर पालिकेत उपजिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक होणार असून त्यातून आरक्षण सोडत काढले जाणार आहेत. आरक्षणाची सोडत पूर्ण झाल्यानंतर कोणता प्रभाग कोणासाठी सुटणार ? याची चर्चा जोरदार होईल. कोणाचा प्रभाग राहतो ? कोणाचा जातो आणि कोण होणार बीड नगर पालिकेचा सेवक ? याचाही फैसला दि.८ रोजी होणार आहे. आरक्षणाची सोडत झाली की प्रत्येक प्रभागात भावी नगरसेवक फिरतांना, बोलतांना, चहा-पाणी करतांना दिसुन येणार आहेत. उभे तर अनेकजण राहणार असून बीडच्या नगर पालिकेत ५२ नगरसेवक निवडून येणार आहेत. ते ५२ नगरसेवक कोण ? याचा फैसला निवडणूकीचे मतदान झाल्यानंतरच आणि आलेला निकाल पाहिल्यानंतरच दिसुन यईल.

आज सोमवारी मंत्रालयाच्या ६ व्या मजल्यावर राज्यातील नगर पालिका, नगर पंचायतच्या नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर होणार आहे. बीड जिल्ह्यात एकूण ६ नगर पालिका असून त्यामध्ये बीड, परळी, गेवराई, अंबाजोगाई, माजलगाव, धारूर या नगर पालिकेच्या नगराध्यक्ष पदाची सोडत ही होणार आहे. ज्यांना नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढायची आहे त्यांचे काळीज आजपासूनच ‘धडधड’ करू लागले आहे. आज सकाळी १० वाजल्यापासून या आरक्षणाची सोडत होणार आहे. कोणाचे भाग्य खुलते ? कोणाचे भाग्य संपते ? हे आज झालेल्या सोडतीनंतरच कळेल. कारण अनेकजण गेल्या दोन ते तीन वर्षांपासून नगराध्यक्ष होण्यासाठी बाशिंग बांधून तयार आहेत. एकूण ६ नगर पालिकेतून कोणती नगर पालिका एससीसाठी सुटते हे ही पाहणे महत्वाचे ठरणार आहे. ओबीसी महिलांसाठी आणि खुल्या वर्गातील महिलांसाठी कोणती नगर पालिका सुटते, ओबीसी पुरूष आणि ओपन पुरूषांसाठी कोणती नगर पालिका सुटते हे सोडतीनंतरच कळेल. खास करून बीड नगर पालिके विषयी जोरदार चर्चा असून बीडचा नगराध्यक्ष कोण होणार ? याची चर्चा प्रत्येक गल्लीबोळात,

▶▶ पान २ वर

# डॉ.फरिदा मॅडम यांच्या तत्परतेने महिलेची शस्त्रक्रिया यशस्वी झाली

### अनेक गरजु महिलांना मिळत आहे वेळेवर उपचार

### डॉ.फरिदा मॅडम यांच्यामुळे होत आहेत जिल्हा रूग्णालयात मोठ मोठ्या गंभीर शस्त्रक्रिया



बीड(दिव्य न्युज):- बीड शहरातील एमआयडीसी एरिया मध्ये राहणारी महिला अनिता (नाव बदललेले वय ४४ ) या मागील पाच वर्षापासून पोटाच्या त्रासाने त्रस्त होत्या. अंगावरचे जाणे, पोट दुखणे ,लघवी संडासला त्रास जाणवत होता. या महिलेने पोटाची सोनोग्राफी केली असता पोटात गर्भपिशवीवर मोठी गाठ दिसून

▶▶ पान २ वर

## लाच घेतात, अंमली पदार्थांची तस्करी करतात : २ न्यायाधीशांना कायमचं घरी घालवलं

मुंबई (दिव्य न्युज):- जामीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागणाऱ्या सातारा जिल्हा सत्र न्यायाधीशाला सेवेतून बडतर्फे करण्यात आले आहे. सत्र न्यायालयात आणि नंतर उच्च न्यायालयातील त्यांचा अर्ज फेटाळला आहे. पालघर जिल्हा सत्र न्यायाधीशावरही अशाच प्रकारे कारवाई करण्यात आली आहे.

सातारा जिल्हा न्यायाधीश धनंजय निकम आणि पालघर जिल्हा सत्र न्यायाधीश इरफान शेख या दोघांना सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचे आदेश नुकतेच काढण्यात आले आहेत.त्यांना १ ऑक्टोबरपासून पदमुक्त केले आहे.सातारा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश निकम यांच्यावर जामिनासाठी जामीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. त्यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामिनासाठी आधी सत्र न्यायालयात व नंतर उच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, दोन्ही न्यायालयांनी त्यांचा अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी

▶▶ पान २ वर

## अल्पवयीन तरूणीवर अत्याचार; एक शिक्षकासह दोघे ताब्यात

### ए.आय.प द्वारे अश्लील चित्रीकरण करून अत्याचार करण्यास भाग पाडले

सेलू जिंतूर(दिव्य न्युज):- परभणी जिल्हातील सेलू येथे कृत्रिम प्रणालीचा ( ए.आय.प )वापर करून एका अल्पवयीन विद्यार्थीनीचे अश्लिल फोटो तयार करून तिला धमकी देत तसेच पालकांना माहिती देऊन बदनामी करण्याची धमकी देऊन अल्पवयीन विद्यार्थीनीवर अत्याचार केल्याची घटना शुक्रवारी (दि.३ अक्टोबर) उघडकीस आली. या प्रकरणी अल्पवयीन पिडितेच्या तक्रारीवरून सेलू पोलिसात चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथील शिक्षक संतोष मलसटवाड याची शहरातील बाबासाहेब मंदिर परिसरात अभ्यासिका आहे. आरोपीने पिडितेचे कृत्रिम बुध्दीमता प्रणाली वापरून अश्लिल फोटो तयार करून ते पालकांना दाखवण्याची तसेच बदनामी करण्याची धमकी देऊन इयत्ता ११ वी वर्गात शिकणार्या अल्पवयीन विद्यार्थीनीवर अत्याचार केला. तसेच आरोपी शिक्षकाने पिडितेचे चोरून व्हिडिओ चित्रण केले. अखेर या प्रकरणी पिडितेने पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी करत शिक्षक संतोष मलसटवाड याच्यासह अर्जून ठाकूर आणि नितीन परदेशी यांना ताब्यात घेतले आहे. चौकशीअंती शिक्षक मलसटवाड याने घटनेची कबुली दिली. यावरून सेलू पोलिसात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान सेलू हे शहर मराठवाडयातील शिक्षणाचे माहेर घर असल्याने येथे अनेक जिल्हयातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र या घटनेमुळे विद्यार्थी आणि पालकांत खळबळ उडून चिंतेचे वातावरण पसरले आहे.



## मुस्लिम शिष्टमंडळाने भेट घेताच नगरमधील ‘आय लव्ह मोहम्मद’ रांगोळी प्रकरणी अजितदादांचे पोलिसांना आदेश

अहमदनगर (दिव्य न्युज):- अहमदनगर शहरात जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांविरोधात त्यांचा पक्ष न पाहता कठोर कारवाई करा, असे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पोलिसांना दिले आहेत.

पारनेर येथे अहमदनगर शहरातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी हे आदेश दिले. अहिल्यानगर शहरात 'आय लव्ह मोहम्मद' अशी मुस्लीम धर्मगुरुंच्या नावाची रांगोळी काढत विटंबना केल्यावरून दोन गटात मोठा तणावं निर्माण झाला होता.त्यानंतर विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आंदोलक रस्त्यावर आले होते. यावेळी आंदोलकांनी छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावर रास्ता रोको केला. यावेळी जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज केल्याने आणखी मोठा तणाव निर्माण झाला.

या सर्व घटनेच्या पार्श्वभूमीवरून शहरातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची

▶▶ पान २ वर

## अलखैर पतसंस्थेच्या वतीने दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५१ हजारांची मदत



अंबाजोगाई(दिव्य न्युज):- अंबाजोगाई शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य माणसाला आशेचा किरण दाखवणार्या आणि त्यांच्या जीवनात चैतन्य फुलविणार्या अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेने सामाजिक दायित्व स्वीकारुन आज ओला दुष्काळ पसरला आहे. पावसामुळे शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी उभा राहिला पाहिजे ही भुमिका घेत अलखैर पतसंस्थेने फुल नव्हे फुलाची पाकळी म्हणून ५१ हजार रुपयांची

▶▶ पान २ वर

## आमच्या पोटाचे पाणी वाल्मिक कराडशिवाय ना हलत होतं, ना हलणार..

# पंकजाताई २००९ ते २०२२ पर्यंत धनंजय मुंडेंच्या विरूध्द कट रचत होत्या

## आता पंकजाताईंचा आधार वाटतो का?-करूणा शर्मांचा सवाल

बीड (दिव्य न्युज):- बीडच्या सावरगाव घाटावरील भगवान गडावर मंत्री आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा दसरा मेळावा पार पडला. या दसरा मेळाव्याला पंकजा मुंडेंचे बंधू आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे उपस्थित होते. यावेळी धनंजय मुंडे यांनी भाषण करत विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. त्यासोबतच धनंजय मुंडेंनी शायरीद्वारे मनातील खदखद व्यक्त केली. तसेच कठीण काळात मला माझ्या बहिणीने आधार दिला, असे विधान धनंजय मुंडेंनी दसरा मेळाव्याच्या भाषणात केले होते. आता यावर करुणा शर्मा- मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली.



गेले २५० दिवस माझी वाईट मानसिकता झाली होती. माझी बहीण माझ्या जवळ येऊन तास न् तास बसत होती. ज्या काळात मीडिया ट्रायल सुरू होतं, त्यावेळी माझ्या बहिणीने आधार दिला. माझ्या पक्षाच्या महायुतीच्या नेत्यांनी आधार दिला, असे विधान धनंजय मुंडेंनी केले होते. धनंजय मुंडे यांच्या याच विधानावर करुणा शर्मा- मुंडे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. यावेळी त्यांनी भाऊ-बहिणीच्या संबंधांवर, साखर कारखान्यांवर आणि राजकारणातील गुंडगिरीच्या मुद्द्यांवरून टीका केली आहे.२००९ पासून २०२२ पर्यंत जे दोन भाऊ-बहीण एकमेकांसाठी कट कारस्थान रचत होते आणि ज्या बहिणीला आज आधार मानतात, ती किती त्रास देत होती. तुम्ही माझ्या मांडीवर रात्री दोन-दोन, तीन वाजेपर्यंत रडत होता आणि आज तिचा आधार वाटतो का? तुम्ही म्हणताय की शेतकरी लोकांना पंकजाताई न्याय देतील, कशाप्रकारे न्याय देतील? असा सवाल करुणा मुंडे यांनी केला.

कारखाना तुम्ही बंद केला आणि गोरगरीब लोकांचे पैसे न देता हे दोघे कारखाने तुम्ही बंद केले. आज भी ऊसतोड कामगारांचे पैसे ३०-३०, ४०-४० कोटी दोघा कारखान्यांमध्ये अडकलेले आहेत पण तुम्ही देत नाही, असा गंभीर आरोपही करुणा मुंडेंनी केला.आज पण तुमच्या सभांमध्ये वाल्मिक कराडचे पोस्टर मोठ्या प्रमाणात दाखवण्यात आले. हे संकेत आहे की काय पण असू द्या, आमच्या पोटाच्या पाणी वाल्मिक कराडशिवाय ना हलत होतं, ना हलणार.., त्यासाठी आज तुम्हाला परळीमध्ये कोणी नवीन व्यक्ती नको आहे. जे गुंडागर्दी संपवतील. जरी माझ्यासारखा कोणी नवीन आला तर तो गुंडागर्दी संपवेल, राजकारण आहे ते संपवतील. त्याच्यासाठी तुम्ही दोघे भाई-बहीण एकत्र आलेले आहे. कोणत्याही जनतेची सेवा, शेतकऱ्यांची सेवेसाठी तुम्ही एकत्र आलेले नाही, असाही गंभीर आरोप करुणा मुंडेंनी केला.





मुंबई : आ.रमेश कराड लातूर ग्रामिण मतदारसंघातील श्रीराम विद्यालय ची विद्यार्थीनी रेणापुर ता जि लातूर येथील, सय्यद मदिया खदीर ITI इलेक्ट्रिशन मध्ये देशात दुसरी आली आसल्यामुळे तिचा आज दिल्लीत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वागत व सत्कार करण्यात आला.

# ट्रकभर हळद गायब,व्यापाऱ्याला ३७ लाखांचा गंडा

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- सांगलीला नेण्यासाठी ३० टन हळद दिली असता ट्रकमधील तब्बल ३७ लाख ८१ हजार रुपयांची हळद लंपास करून खोटी तक्रार दाखल करणाऱ्या ट्रक मालक आणि चालकावर अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लोखंडी सावरगाव कळंब फाटा परिसरात घडली.

फिर्यादी प्रितेश दुर्गाप्रसाद सोनी हे छत्रपती संभाजीनगर येथील हे दुर्वा कमोडीटी प्रा. लि. या कंपनीचे संचालक असून, ते सांगली येथे हळद दळून विक्री करतात. त्यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी राधा सर्वेश्वर कंपनी सोलापूरमार्फत ३० टन हळद खरेदी करून स्टार अॅग्रो वेअरहाऊस, लिंबाळा (एमआयडीसी, हिंगोली) येथून सांगलीकडे पाठवण्यासाठी ट्रक क्रमांक एमएच २६ एडी २९३५ या वाहनाद्वारे वाहतूक ठरवली होती.ट्रक मालक नदीम खान मुजाहेद खान (रा. अपना कॉर्नर, परभणी) आणि चालक सय्यद अजगर सय्यद सज्जान (रा. दर्गारोड, परभणी) यांच्याकडे माल ताब्यात देण्यात आला. मात्र, सांगलीला पोहोचण्याआधी नदीमने सोनी यांना कळवले की अंबाजोगाईजवळ कळंब फाटा येथे अज्ञात लोकांनी ट्रक लुटल्याची घटना घडली आहे. त्यानंतर सोनी घटनास्थळी पोहोचले असता ट्रकमध्ये फक्त ३० पोते शिल्लक असून उर्वरित ५७० पोते हळद गायब असल्याचे दिसून आले.

चौकशीत चालक सय्यद अजगरने कबुली दिली की ट्रक कोणत्याही चोरट्यांनी चोरलेला नसून ट्रकमालक नदीम खान यांनी संगणमत करून ट्रकमधील हळद कोठेतरी विल्हेवाट लावली व पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दिली.या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम ३१६(२), ३१६(३), ३१८(४), २१७, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास सपोनि जगताप हे करीत आहेत.

पान ४ वरून

## पूरग्रस्तांच्या मदतीला

कलाकार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.४) बीड, शिरूर कासार तालुक्यातील विविध गावातील घरात पाणी शिरलेल्या पूरग्रस्तांना डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह कलावंतांच्या हस्ते ६०० किराणा किटचे वाटप केले. गात शिरापूर येथील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ऋतुराज फडके, प्रसाद दाने, श्रेयस राजे, सौरभ पात्रुडकर, गौरव कुलकर्णी, ललित कुलकर्णी हे कलाकार उपस्थित होते. तसेच हिंगणी खुर्द, जेबा पिंपरी, कपिलधारवाडी, आर्वी, मार्करवाडी, शिरापूर गात, फुलसांगवी, गाजीपूर, हाजीपूर, तरडगव्हाण, हिवरसिंगा जांब, ढोकवड, कमलेश्वर धानोरा, साक्षाळ पिंपरी, उमरद जहागीर, बहादरपूर या गावांमध्ये किराणा किटचेही वाटप केले. बीड व शिरूर कासार तालुक्यातील विविध कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते भागवत तावरे यांच्यासह ऋतुराज फडके, प्रसाद दाने, श्रेयस राजे, सौरभ पात्रुडकर, गौरव कुलकर्णी, ललित कुलकर्णी हे कलाकार उपस्थित होते. तसेच, कपिलधारवाडी येथे अखिल भारतीय नाट्य परिषदेचे प्रा.डॉ.संजय पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## आष्टीत गुन्हा दाखल;

इसमाने पाचशेच्या तब्बल ६४ नोटा म्हणजेच ३२ हजार रूपये व्यवहारात आणून त्या नोटा खऱ्या असल्याचे भासवून त्याचा स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी चलनात वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात आष्टी पोलीस ठाण्यातील पो.ह.प्रविण क्षीरसागर यांच्या तक्रारीवरून प्रकाश पाराजी खाडे (२४) याच्याविरूध्द कलम १७९, १८० बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खाडे याने या पाचशेच्या बनावट नोटा कोठून आणल्या ? यामागे एखादे मोठे रॅकेट आहे का ? याची पोलीस चौकशी करत आहेत.

## पदवीधर मतदार नाव

जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यात खालील प्रमाणे नोंदणी मदत केंद्र सुरु करण्यात येत आहेत,यांना संपर्क करुन कोरे फॉर्म घेवून पुर्णपणे भरु शकतात,यासाठी कुलस्टार एसी सर्विस सेंटर दर्गाह समोर बालेपीर बीड ७२७६७८१८०८, सिराज सिद्दीकी अल्टिमेट ऑनलाईन सेंटर,महादेव स्वीट होम च्या पाठीमागे,बशीरगंज बीड९८२३०८९७६८, मुफ्ती हारीस, रहेमत बुक डेपो, नुरानी मस्जिद , मोमीनपुरा बीड९०२८४५२४८७,अफ्फान महाराष्ट्र मल्टी सर्विसेस बाबा चौक, इस्लामपुरा बीड ७८२१८४४०८३, इमरान शहा जय हिंद मल्टी सर्विसेस गांधीनगर बीड ९७६६५४१२६६, जीशान क्लासिक मोबाईल महसूल कॉलनी बीड ८५०७७७७७२७, फरहान डीसेंट सर्विसेस डॉक्टर झिया उररहमान हॉस्पिटल च्या बाजूला बार्शी नाका बीड ८७९३०१३७५७,येथे फॉर्म भरन्यासाठी मदत घेऊ शकता, सोबतच परळी नजीर अहमद ९६७३९७९७८६,जब्बार खान ९०२८९६५९२३, आंबेजोगाई फहाद फारुकी ७०२०१६७०२०,शेख मुजाहेद ९४२१२७९७४९, अजिमुद्दिन सर ९७३०४६७६३३, केज इद्रिस सर ८६६८५२०२१३, यकिन खान ९४२२६५५६१०, माजलगाव नुमान चाऊस ९७६६६२७९८६,अब्दुल रशीद ९८८१८८१९८९,गेवराई वडवणी ८५५१९९९९८७,सिरसाला ९२८४०५५४९०,आष्टी डॉ. नदीम शेख९८६०८४४८७१, पाटोदा ड. सय्यद सज्जाद ९८५६५६७७७७,गेवराई ९५२७४७८६६२, शिरुर शेख अझहर ९४२३२३८९०९, नेकनूर अर्शद शेख ७०९८०३०४०५ यांना फॉर्म भरण्यासाठी मदत व मार्गदर्शनासाठी संपर्क करुन फॉर्म भरू शकता असे आवाहन पदवीधर संघटनेचे नेते प्रा.अमर शेख यांनी पदवीधरांना केले आहे, फॉर्म सोबत लागणारे कागदपत्रे - पदवीची डिग्री किंवा मार्कमेमो, आधारकार्ड, इलेक्शनकार्ड व दोन पासपोर्ट फोटो तसेच महिला उमेदवार किंवा नावात बदल असेल तर पॅनकार्ड किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा गॅझेट यापैकी एकाची झेरॉक्स प्रत,व्हॉट्सअँप मोबाईल नंबर, ईमेल आयडी व फॉर्म न. १८ इत्यादी,तरी सर्व पदवीधरकांनी पदवीधर मतदार संघाच्या मतदार यादीत नाव लावून नोंदणीचा फायदा करुन घ्यावा असे आवाहन पदवीधर नेते प्रा. अमर शेख यांनी केले आहे.

पान १ वरून

## कोणाच्या

चौका-चौकात होतांना दिसुन येत आहे. सर्वात जास्त चर्चा आहे ती महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे चेअरमन समीर काझी यांची. गेल्या अनेक दिवसांपासून वक्फ बोर्डाचे चेअरमन असून त्या माध्यमातून त्यांनी अत्यंत धाडसी निर्णय घेत उत्कृष्ट कामे केले आहेत. तसेच पाणीदार आमदार म्हणून ज्यांची चर्चा आहे ते बीड नगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष सय्यद सलीम यांची, मागच्या विधानसभा निवडणूकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधानसभेचे प्रबळ दावेदार असलेले फारूख पटेल यांचे, शेवटच्या क्षणी उमेदवारी नकारण्यात आली, तेंव्हापासून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी त्यांना १००% मिळण्याचे चिन्ह दिसुन येत आहेत. चर्चा अशी ही आहे की विधानसभेची जागा अजित पवार गटाला सुटली आणि आता होणाऱ्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीसाठी बीडची जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सुटणार असल्याची चर्चा होत असून असे झाल्यास समीर काझी हे उमेदवार असतील. शेख निजाम, शेख तय्यब आणि योगेश क्षीरसागर यांच्याही नावाची चर्चा असून एमआयएमने अॅड.शेख शफीक यांची उमेदवारी जाहीर केलेली आहे. संदीप क्षीरसागर आणि सय्यद सलीम यांचे कट्टर समर्थक असलेले शेख वकील सर यांनाही संदीप क्षीरसागर उमेदवाराच्या रिंगनात उतारू शकतात. शेख मतीन, अब्दुल सलाम सेठ हे ही एमआयएमकडून इच्छुक आहेत. भारतीय जनता पार्टीकडून यापुर्वी नगर पालिकेचे निवडणूक लढवलेले दोन दिग्गजांचे नावे चर्चिले जात असून त्यामध्ये सलीम जहाँगिर आणि नवनाथ शिराळे यांचे नाव चर्चेत आहे. ऑल महाराष्ट्र केजीएन ग्रुपचे जहीर अली शहा कादरी यांच्याही नावाची चर्चा बीड शहरात जोरदार सूरू असून जहीर कादरी यांचा मोठा जनसंपर्क बीड शहरात आहे. आजच कळेल कोण उभा राहणार आणि कोण राहणार नाही ? याचाच फैसला मंत्रालयात आरक्षणक्षाची सोडत झाल्यानंतर होईल.

## लाच घेतात, अंमली

अर्ज फेटाळला. त्यानंतर त्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती.याप्रकरणी त्यांची उच्च न्यायालय प्रशासनाच्या शिस्तपालन समितीकडून चौकशी होऊन अहवाल सादर केला होता. त्याअहवालाच्या आधारे त्यांच्या बडतर्फीचा आदेश काढण्यात आला आहे.इरफान शेख यांच्यावर देखील अशाच स्वरूपाचे गंभीर आरोप होते. त्यांचीही प्रशासनाच्या शिस्तपालन समितीकडून चौकशी करण्यात आली. शेख हे मुंबईतील बॅलार्ड पिअर न्यायालयात दंडाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्याकडे अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्याची प्रकरणे सुनावणीसाठी होती.

कारवाईदरम्यान जप्त केलेल्या आणि मुद्देमाल म्हणून न्यायालयात सादर केलेल्या अमली पदार्थांची ते ते तस्करी करत होते, असा आरोप करणारी याचिका उच्च न्यायालयात करण्यात आली होती. कॉर्डिलिया क्रूझवरील पार्टीला शेख हे उपस्थित होते. त्यांनीही नशा केली होती. परंतु, क्रूडावरील पार्टीवर छापा टाकणाऱ्या केंद्रीय अमली पदार्थ विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तेथून बाहेर काढले, असा आरोपही याचिकेत करण्यात आला होता.

## डॉ.फरिदा मॅडम

आले . त्यांना रुग्णालय मध्ये दिनांक २८ सप्टेंबर व २९ सप्टेंबर रोजी तपासण्या झाल्यानंतर दिनांक २९ सप्टेंबर रोजी जिल्हा रुग्णालय येथे ऍडमिट करण्यात आले. दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी गंभीर शस्त्रक्रिया करून महिलेच्या पोटातून जवळपास पाच किलो मांसाचा गोळा ( फायब्रॉइड ) व गर्भपिशवी सहित काढण्यात आले.

जिल्हा रुग्णालय बीड चे शल्य चिकित्सक डॉ संजय राऊत अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ संतोष शहाणे, व डॉ शेख फरिदा स्त्री रोगतज्ञ ( वर्ग ०१ ) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोठी शस्त्रक्रिया यशस्वी रित्या झाली. अशा गंभीर शस्त्रक्रिया खाजगीत करायची असल्यास ७० ते ८० हजार रुपये खर्च येत असल्याचे सांगण्यात येते, परंतु जिल्हा रुग्णालय बीड येथील डॉ सावंत, कोठुळे भूलतज्ञ, ओटीब्रदर श्री घुले यांनी ही शस्त्रक्रिया डॉ शेख फरीदा ( स्त्रीरोग तज्ञ ) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पाडली. जिल्हा रुग्णालय बीड येथील या टीम बद्दल नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

## मुस्लिम शिष्टमंडळान

भेट घेत शहरात आणि जिल्ह्यात जाणीवपूर्वक जातीय तणाव निर्माण होतील अशा घटना वारंवार घडत असल्याकडं लक्ष वेधलं. तसंच गेल्या दहा महिन्यांपासून काही लोकप्रतिनिधी व जातीयवादी संघटनेचे लोक वारंवार तणाव निर्माण होणारी वक्तव्य करत आहेत.कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्यासाठी जाणूनबुजून अशी कृत्य सुरू असूनही पोलीस प्रशासन त्यांच्या विरोधात कारवाई करत नाहीत, असंही या शिष्टमंडळाने अजितदादांच्या कानावर घातलं. त्यानंतर अजित पवारांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गेना बोलावून जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांविरोधात त्याचा पक्ष न पाहता कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले शिवाय जातीय तणाव कमी करण्यासाठी मोहल्ला समिती स्थापण्याची सूचना देखील यावेळी केली.

शिष्टमंडळाची अजित पवारांना नेमकी मागणी काय?

मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने अजित पवारांना सांगितलं की, कोठला येथील रास्ता रोको आंदोलनाशी संबंध नसतानाही अनेकांना अटक केली असून त्यांची नावे वगळावीत. पोलीस गुन्ह्याशी संबंध नसलेल्यांना त्रास देणं थांबवावं. तसंच पोलिसांनी पहाटेची गस्त वाढवावी आणि प्रक्षोभक भाषण करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी स्वत:हून कारवाई करावी, अशी मागणी केली.

## अलखैर पतसंस्थेच्या

आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यत निधीसाठी आज उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांच्याकडे सूपूर्द केली.

संपूर्ण मराठवाडयात मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने शेतकर्यांच्या हातातोंडला आलेले पिक गेले आहे. त्यासोबतच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतीचे हे आतोनात नुकसान झाले आहे. न भरुन निघणारी हानी झालेली असून शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे तो जगला पाहिजे आणि तो पुन्हा स्वाभिमानाने उभा टाकला पाहिजे ही भुमिका अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व पदाधिकार्यांनी घेतली आणि तातडीची बैठक घेवून ५१ हजार रुपये दुष्काळग्रस्त शेतकर्यांना देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यत निधीसाठी देण्याचे निश्चित केले त्यानुसार आज शुक्रवार दि.३ ऑक्टोबर रोजी उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांना धनादेश सूपूर्द केला या प्रसंगी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, पतसंस्थेचे मार्गदर्शक व माजी उपनगराध्यक्ष शेख रहीमभाई, पतसंस्थेचे अध्यक्ष शेख उमर फारुक, उपाध्यक्ष खतीब मुज़म्मिल, सचिव शेख रिजवान, संचालक शेख मुजाहेद, व्यवस्थापक सय्यद रऊफ, नुर पटेल, बबलु सिद्दीकी,इरशाद भाई, वसीम भाई, सुजादभाई, वाजेद खतीब, हुसैन शाह यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पतसंस्थेने राबविलेले या सामाजिक उपक्रमाचे सर्वस्तरांतून कौतुक केले जात आहे कारण ज्याच्यामुळे आपण आहोत त्या शेतकरी बांधवांना वाचविण्याची भुमिका पतसंस्थेने धेतल्यामुळे पतसंस्थेच्या सर्व संचालक मंडळाचे ऋण व्यक्त केले जात आहे.